महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : २३ वा दिनांक : ०९/१०/२०२४ वार : बुधवार

# हरियाणात तिसऱ्यांदा भाजपचे सरकार, जम्मू कश्मिर फारूक अब्दुलांकडेच...



| पक्ष | पुढे | विजयी | एकूण |
|---|---|---|---|
| भाजप | 0 | 48 | 48 (+8) |
| कॉंग्रेस | 1 | 36 | 37 (+6) |
| जेजेपी | 0 | 0 | 0 (-10) |
| इनेलो-बसपा | 0 | 2 | 2 (+1) |
| इतर | 0 | 3 | 3 (-5) |

| पक्ष | पुढे | विजयी | एकूण |
|---|---|---|---|
| नॅशनल कॉन्फरन्स | 0 | 42 | 42 (+27) |
| भाजप | 0 | 29 | 29 (+4) |
| पीडीपी | 0 | 3 | 3 (-25) |
| कॉंग्रेस | 0 | 6 | 6 (-6) |
| इतर | 0 | 10 | 10 (+3) |



**नवी दिल्ली :-** झालेल्या हरियाणाच्या निकालांनी सर्वांना चकीत करून, भाजपच्या बाजूने तिसऱ्यांदा सत्ता सोपविली तर १० वर्षानंतर निवडणुका झालेल्या जम्मू कश्मिरमध्ये नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारूक अब्दुलांनी वर्चस्व मिळविले.

हरियाणा विधानसभा निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पुन्हा एकदा सत्ता हस्तगत करून भाजपला सत्तेपासून दुर करेल अशा प्रकारचे अंदाज सर्वच एक्झीट पोलनी जाहिर केले होते. सकाळी निकालाची सुरूवात झाल्यानंतर त्या पद्धतीचे कलही हाती येत होते. मात्र जस जसे निकाल येत गेले तसतसे भाजप आणि कॉंग्रेसमध्ये विजयाचे अंतर वाढत गेले. शेवटी भारतीय जनता पक्षाने ४८ जागा मिळवत बहुताचा आकडा पार करून तिसऱ्यांदा सत्ता हस्तगत केली.

दुसरीकडे निकालापूर्वी सर्वच बोलबाला असलेली कॉंग्रेस मात्र ३७ जागांवर थांबली. या निवडणुकीत जेजेपीसह स्थानिक पक्षांना जबरधक्का बसला. कॉंग्रेसने मागच्या निवडणुकीपेक्षा ६ जागा तर भाजपने ८ जागा जास्तीच्या मिळवल्या. जेजेपी आणि बसपाला शुन्य तसेच इनेलो २ तर तीन अपक्ष निवडून आले.

जम्मू कश्मिरमध्ये नव्वद जागांसाठी झालेल्या निवडणुकीत फारूक अब्दुलांच्या नॅशनल कॉन्फरन्स पक्षाला ४२ तर त्यांचा सहयोगी पक्ष असलेल्या कॉंग्रेसला ६ जागा मिळाल्या. भारतीय जनता पक्षाला २९ तर महेबुबा मुफ्ती यांच्या पीडीपीला फक्त तीन जागा मिळाल्या, १० अपक्ष ही निवडून आले. या निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्सला २७ जागांचा तर भाजपला चार चागांचा फायदा झाला. दुसरीकडे पीडीपीला २५ जागांचा तर कॉंग्रेसला १० जागांचा फटका बसला. गेल्या वेळी पेक्षा तीन अपक्ष जास्त निवडून आले.

## अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग करणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल:१५ दिवसांपासून करत होता पाठलाग

**कळमनुरी :** कळमनुरी पोलिस ठाण्यांतर्गत एका अल्पवयीन विद्यार्थीनीचा विनयभंग करून अश्लिल शेरोशायरी करणाऱ्या तरुणाविरुध्द कळमनुरी पोलिस ठाण्यात सोमवारी ता. ७ रात्री उशीरा गु्न्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कळमनुरी पोलिस ठाण्यांतर्गत एका गावातील अल्पवयीन विद्यार्थीनी गावातील शाळेत जाते. सदर विद्यार्थिनी घरून निघाल्यानंतर तसेच शाळा सुटल्यानंतर अंकुश सुर्यवंशी (रा. बाभळी) हा तरुण त्या विद्यार्थीनीचा पाठलाग करीत होता. मागील पंधरा दिवसांपासून तो तिच्या मागावरच राहात होता. शाळेतून घरी परत येत असतांना तो विद्यार्थीनीकडे पाहून अश्लिल हावभाव करीत होता तर अश्लिल बोलत होता. सदर प्रकार कोणाला सांगितल्यास जिवे मारतो अशी धमकीही त्याने विद्यार्थीनीला दिली होती. एवढेच नव्हे तर त्याने विद्यार्थीनीच्या कुटुंबियांना त्रास होण्यासाठी तिच्या आईच्या मोबाईलवर फोन करीत होता.

दरम्यान अंकूश याच्या धमकीमुळे विद्यार्थीनी घाबरून गेली होती. सदर प्रकार घरी सांगितल्यास आपले काही बरेवाईट होईल किंवा घरची मंडळी शिक्षण सोडून देण्यास भाग पाडतील अशी भिती तिला होती. त्यामुळे तीने हा प्रकार कोणालाही सांगितला नाही. मात्र अंकूश याच्याकडून होणारा त्रास वाढत गेल्यामुळे अखेर तिने हा प्रकार तिच्या कुटुंबियांना सांगितला. त्यानंतर तिच्या कुटुंबियांनी तिला सोबत घेऊन थेट कळमनुरी पोलिस ठाणे गाठले. त्या विद्यार्थीनीच्या तक्रारीवरून पोलिसांनी अंकूश याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. उपनिरीक्षक संतोष इंगळे पुढील तपास करीत आहेत. गुन्हा दाखल झाल्यानंतर अंकूश फरार झाला असून पोलिसांनी त्यांचा शोध सुरु केला आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## "पालक मेळावा" मोठ्या उत्साहात साजरा!




**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे शिवछत्रपती कनिष्ठ महाविद्यालयामध्ये दिनांक २८ /०९/ २०२४ शनिवार रोजी दुपारी तीन वाजता कला, वाणिज्य व विज्ञान या शाखेमधील विद्यार्थ्यांचा पालकांचा पालक मेळावा आयोजित केला गेला स्वागत गीताने प्रमुख पाहुण्यांचे व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले, तसेच दीप प्रज्वलन कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक डॉ. मनिषा नाईक मॅडम (मानसशास्त्र विभाग, देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर) व इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये पालक-शिक्षक यांचा संवाद महत्त्वाचा आहे, विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिवापर टाळावा, पालकांनी विद्यार्थ्यांकडे लक्ष द्यावे, स्वतःच्या पाल्याची दुसऱ्यांच्या पाल्याशी तुलना टाळावी, सातच्या आत घरात हे बंधन मुलांना आणि मुलींना समान असावे, पाल्याची अवास्तव लाड टाळावेत, विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी चांगला अभ्यास करावा असे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर .पी. पवार, प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य प्रा. बी आर वहाटूळे, उपप्राचार्य डॉ एस डी राजमाने, प्रास्ताविक पर्यवेक्षक डॉ गवळी ए .एम. तसेच आभार पर्यवेक्षक प्रा. आर. व्ही. पाटील, सूत्रसंचालन प्रा. एस. डी. सोळंके यांनी केले. तसेच या कार्यक्रमाला पालकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली व पालक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ ऑक्टोबर २०२४


## जयभवानीच्या " राष्ट्रीय सेवा योजना " विभागाच्या वतीने दान उत्सव




पाटोदा (प्रतिनिधी) दि. ८ ऑक्टोबर : येथिल जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा च्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित पाटोदा शहरात भव्य असा दान -उत्सव घेण्यात आला.या उपक्रमांतर्गत कपडे व पादत्राणे माणुसकीची भिंत या सेवाभावी संस्थेला दान करून दान उत्सव साजरा करण्यात आला.

या दान उत्सवात महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांनी गोरं गरीब व निराधार लोका साठी वापरण्यायोग्य कपडे व पादात्राणे मोठ्या प्रमाणात माणुसकीची भिंत या ठिकाणी प्राचार्य डॉ. विश्वास कदम, यांच्या हस्ते दान करण्यात आले बस स्थानक परिसरात या कपड्यांसाठी गरीब लोकांनी गर्दी केली होती. रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. बंडू लोखंडे, डॉ. शिवाजी काकडे तसेच प्रा. सोमनाथ घाडगे, प्रा. डॉ. वंदन जाधव आणि श्रीमती प्रा. डॉ. कल्पना घारगे, माणुसकीची भिंत या सेवाभावी संस्थेचे श्री.दत्ता देशमाने व श्री. रामदास भाकरे यांची उपस्थिती होती.

या उपक्रमामध्ये रासेयो स्वयंसेवकानी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. जय भवानी महाविद्यालयाने दसरा दिवाळी च्या प्रसंगी गोरं गरिबांची दिवाळी केली.महाविद्यालय सतत सामाजिक बांधिलकी ने अनेक सामाजिक उपक्रम राबवत असते.या दान उत्सव कार्यक्रमाचे पाटोदा शहरातील नागरिक कौतुक करत होते.

## मोदींना मानणारा एक वर्ग भाजपच्या मागे:तो सभेत-रस्त्यावर दिसत नाही : रावसाहेब दानवे



**अहमदनगर :** वृत्तवाहिन्यांनी याआधीही छत्तीसपड आणि राजस्थानमध्ये भाजपची पिछेहाट होईल असे सांगितले होते, मात्र त्यावेळी तसे होणार नाही, असे मी म्हणालो होतो. तसेच हरियाणाबाबतही वृत्तवाहिन्यांच्या एक्झिट पोलमध्ये भाजपला पिछेहाट दाखवत होते. मात्र, तसे घडले नाही. पंतप्रधान मोदींना मानणार एक वर्ग भाजपच्या मागे आहे. तो सभेत किंवा रस्त्यावर दिसत नाही, अशी प्रतिक्रिया रावसाहेब दानवे यांनी हरियाणातील निकालावर दिली आहे. तसेच जम्मू-काश्मीरमधील निकाल आम्हाला मान्य असल्याचेही त्यांनी सांगितले.

हरियाणा आणि जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीचे निकाल समोर येत आहेत. हरियाणात मतमोजणीच्या सुरुवातीला काँग्रेस आघाडीवर होती. मात्र काही वेळाने भाजपने मुसंडी मारत काँग्रेसला पिछाडीवर टाकले. हरियाणात भाजपला स्पष्ट बहुमत मिळत असल्याचे चित्र येत असलेल्या निकालावरुन दिसत आहे. यावर भाजप नेत्यांच्या प्रतिक्रिया येत आहेत. रावसाहेब दानवे यांनीही यावर प्रतिक्रिया दिली असून महाराष्ट्रातही हरियाणासारखीच परिस्थिती होईल, असे म्हटले आहे.

**मोदींना मानणारा एक वर्ग भाजपच्या मागे उभा असतो**

रावसाहेब दानवे म्हणाले, यापूर्वी वृत्तवाहिन्यांनी छत्तीसगड, राजस्थानमध्ये भाजपचे पीछेहाट दिसेल, असे सांगितले होते. मात्र, त्यावेळी देखील मी म्हटले होते की, तसे होणार नाही. तसेच हरियाणाबाबत देखील वृत्तवाहिन्यांच्या एक्झिट पोलमध्ये भाजपला पीछेहाट दाखवत होते. मात्र तसे घडले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मानणारा एक वर्ग आहे. हा वर्ग सभेत आणि रस्त्यावर दिसत नाही. मात्र, त्यांच्या प्रपंचात पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे जी सरकारी मदत होते, त्यामुळे हा वर्ग पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपच्या मागे उभा राहतो, असे रावसाहेब दानवे म्हणाले.

**जम्मू-काश्मीरमधील कौल आम्हाला मान्य** रावसाहेब दानवे यांनी जम्मू-काश्मीरमधील निकालावर देखील प्रतिक्रिया दिली. जम्मू-काश्मीरमधील कौल आम्हाला मान्य आहे. भाजप केवळ निवडणुकीसाठी राजकारण करत नाही. जम्मू-काश्मीरमध्ये सर्वसामान्यांना आणि सर्वांना सारखा न्याय मिळावा, यासाठी भाजप काम करत असते. काश्मीरमधील निकालात पिछेहाट दिसत असली तरी आमची तेवढी पिछेहाट झालेली नाही, असे रावसाहेब दानवे म्हणाले.

**हरियाणा, काश्मीरच्या निकालावर काय म्हणाले फडणवीस?**

लोकशाही आपल्या देशामध्ये किती मजबूत आहे, हे जम्मू-काश्मीरमधील निवडणुकांवरुन स्पष्ट होत असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. आम्ही सैन्याच्या भरोशावर काश्मीर आमच्याकडे ठेवले असल्याचा प्रचार पाकिस्तान जगभरात करत होता. मात्र, आता जगभरातील लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत जम्मू-काश्मीरमध्ये शांततेत निवडणूक प्रक्रिया पार पडली असल्याचे त्यांनी म्हटले आहे. जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० काढल्यानंतर रक्ताचे पाट वाहतील असा दावा काही लोक करत होते. मात्र आता जम्मू-काश्मीरमध्ये भाजपचा निकाल चांगला असल्याचा दावा फडणवीस यांनी केली आहे.

## माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्यावर अत्याचाराचा गुन्हा : मुंबईहून परत येताच पोलिसांनी केली अटक



**श्रीरामपूर :** श्रीरामपूरचे माजी आमदार भानुदास मुरकुटे यांना पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी मुरकुटे यांना काल रात्री उशिरा त्यांच्या श्रीरामपूरमधील निवासस्थानावरून ताब्यात घेतले. त्यांच्यावर अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे. मुरकुटे यांच्याविरोधात अत्याचाराचा गुन्हा दाखल झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. त्यांना अटक झाल्याचे समजताच सकाळी कार्यकर्ते त्यांच्या निवासस्थानासमोर जमले होते.

राहुरी तालुक्यातील मांजरी येथील एका महिलेने राहुरी पोलिस ठाण्यात मुरकुटे यांच्या विरोधात अत्याचाराची फिर्याद दिली आहे. महिलेच्या फिर्यादीवरुन पोलिसांनी मुरकुटे यांना अटक केली. भानुदास मुरकुटे हे कामानिमित्त मुंबईत होते. काल रात्री श्रीरामपूरमध्ये आल्यानंतर पोलिस चौकशीसाठी त्यांच्या निवासस्थानी दाखल झाले. चौकशी झाल्यानंतर पोलिसांनी त्यांना अटक केली. या सर्व प्रकारामुळे भानुदार मुरकुटे यांना रक्तदाबाचा त्रास जाणवू लागला. त्यामुळे पोलिसांनी त्यांना अहमदनगरमधील जिल्हा रुग्णालयात दाखल केले.

भानुदार मुरकुटे यांची राजकीय कारकीर्द भानुदास मुरकुटे मागील ३६ वर्षांपासून राजकारणात आहे. आपल्या राजकीय कारकीर्दीत ते तीन वेळा श्रीरामपूरचे आमदार झाले आहेत. त्यांनी चार्टर्ड अकाउंटंट म्हणून व्यवसायाला सुरुवात केली होती. त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात पराभवाने झाली होती. भानुदार मुरकुटे यांनी १९७८ मध्ये पहिल्यांदा जिल्हा परिषदेची निवडणूक लढवली, मात्र त्यात त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता. त्यानंतर १९८० मध्ये काँग्रेस (आय)कडून पहिल्यांदा विधानसभा लढले. यावेळी त्यांचा २५ ते २६ हजार मतांनी विजय झाला. भानुदार मुरकुटे मागील ३६ वर्षांपासून अशोक सहकारी साखर कारखान सांभाळत आहेत. मध्यंतरी त्यांनी तेलंगणाचे मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांच्या बीआरएस पक्षात प्रवेश केला होता.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## महाराष्ट्र सरकारचे तोंड झाकले तर पाय उघडे पडतात:या सरकारने राज्य दिवाळखोरीत काढले असल्याचा अंबादास दानवेंचा आरोप



**छत्रपती संभाजीनगर :** इलेक्शन जुमल्यांवर पैसे खर्च करत सुटलेल्या महाराष्ट्र सरकारचे आता तोंड झाकले तर पाय उघडे पडत असल्याची टीका विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आहे. राज्यातील कंत्राटदारांची बिले थकल्यामुळे त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. या संदर्भात अंबादास दानवे यांनी सरकारवर निशाणा साधला. या सरकारने राज्य दिवाळखोरीत काढले असल्याचा आरोप देखील त्यांनी केला आहे.

आपल्या एका पोस्टच्या माध्यमातून दानवे यांनी सरकारवर टीका केली. आज ठेकेदार जात्यात आहेत, तर सरकारी कर्मचारी सुपात आहे. मात्र, अगदी नजीकच्या काळात सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगाराचे पैसे या सरकारकडे राहणार नसल्याचा आरोप देखील दानवे यांनी केला आहे.

**ठेकेदारांची देयके महायुती सरकारने थकवली**

या संदर्भात अंबादास दानवे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, 'महाराष्ट्र दिवाळखोरीत निघालाय! इलेक्शन जुमल्यांवर पैसे खर्च करत सुटलेल्या महाराष्ट्र सरकारचे आता तोंड झाकले तर पाय उघडे पडतायेत. झालेल्या कामांची चाळीस हजार कोटींची ठेकेदारांची देयके राज्यातील महायुती सरकारने थकवली आहेत. यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास, जल जीवन मिशन, जलसंवर्धन, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, पालिका, नगरपरिषदा आदी महत्वाच्या विभागांमधील बिलांचा यात समावेश आहे. लक्षात ठेवा, आज ठेकेदार जात्यात आहेत, तर सरकारी कर्मचारी सुपात. अगदी नजीकच्या काळात सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगाराचे पैसे या सरकारकडे राहणार नाहीत, कारण या सरकारने महाराष्ट्र दिवाळखोरीत काढला आहे!'

**विजय वडेट्टीवार यांचीही टीका**

या संदर्भात विजय वडेट्टीवार यांनी देखील राज्य सरकारवर टीका केली होती. या संदर्भात त्यांनी केलेल्या पोस्टमध्ये म्हटले होते की, 'कुठे गेली ती आर्थिक शिस्त ? राज्यातील कंत्राटदारांना आंदोलन करण्याची वेळ आली आहे. महायुती सरकारच्या आर्थिक बेशिस्त कारभारामुळे राज्यातील कंत्राटदारांची तब्बल ४० हजार कोटींची बिल थकली आहेत. कंत्राटदार आणि आणि अभियंता संघटनांनी पाच वेळा आठवण करून देऊनही या सरकारने बिल चुकती केली नाही. स्वतःच्या प्रचारासाठी सरकारी तिजोरीतून उधळपट्टी सुरू आहे, पण काम करणाऱ्या कंत्राटदारांची बिल द्यायला तिजोरीत पैसे नाही. मला खूप आर्थिक शिस्त आहे, मी खूप आर्थिक शिस्त पाळून काम करतो निर्णय घेतो असं उपमुख्यमंत्री अजित पवार सगळीकडे सांगतात. हे सरकार जाता जाता महाराष्ट्राची तिजोरी रिकामी करून महाराष्ट्राला खड्ड्यात घालत आहेत. ती आर्थिक शिस्त आता कुठं गेली ? सरकारी तिजोरीतून कोण उधळपट्टी करत आहे हे महाराष्ट्र समोर यायला हवे.' असे त्यांनी म्हटले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ ऑक्टोबर २०२४


## अरे शहाण्या, अर्थमंत्री तू आहेस की मी आहे?: अजित पवार



**सोलापूर:** उपमुख्यमंत्री अजित पवार सध्या सोलापूरच्या दौऱ्यावर आहेत. येथे लाडक्या बहीणींशी त्यांनी संवाद साधला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील उपस्थित होते. लाडकी बहीण योजनेला विरोधक नाव ठेवत आहेत, यावर अजित पवारांनी चांगलाच निशाणा साधत प्रत्युत्तर दिले आहे.

लाडकी बहीण योजनेवर बोलताना अजित पवार म्हणाले, एवढी चांगली योजना आम्ही सुरू केली. मात्र मागच्या महिन्यातच एका कॉंग्रेसच्या नेत्याने बोलताना सांगितले की आम्ही ही लाडकी बहीण योजना बंद करू. का? महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्याची संधी आम्ही देत आहोत, मात्र हे या विरोधकांना नको आहे. ही योजना चालू ठेवायची की नाही हे माऊलींनी तुमच्या हातात आहे. येत्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांना निवडून आणा. ही योजना पुढील पाच वर्षे चालू ठेवेल हा माझा शब्द आहे.

तू अर्थमंत्री आहे की मी अर्थमंत्री आहे?

काही त्यांचे बगलबच्चे सांगत आहेत, अरे आता पगारच होणार नाही. अरे आता यांच्याकडे पैसेच राहणार नाहीत. अरे शहाण्या सांगणाऱ्या, तू अर्थमंत्री आहे की मी अर्थमंत्री आहे? तिजोरी तुझ्या हातात आहे की माझ्या हातात आहे? का लोकांना खोटे बोलतो? तुम्ही संसार करत असताना, तुमच्या खिशात आणि तुमच्या तिजोरीत पैसे किती आहेत हे तुम्हाला माहीत असते की बाहेरच्या लोकांना माहीत आहे? आज यांना लोकांच्यापुढे जायला तोंड नाही, चेहरा नाही म्हणून हे लोकांना सांगतात यांची कॉंट्रॅक्टरची बिले थकलीत, यांचे पुढचे पगारच होणार नाहीत, हे सगळे दिशाभूल करण्याचा प्रकार असल्याचे अजित पवारांनी सांगितले.

बहिणीला दिलेली ओवाळणी कुठला भाऊ काढून घेतो का?

विरोधकांनी आमची टिंगल टवाळी केली, म्हणाले काही पैसे येणार नाहीत. जुलै ऑगस्टचे पैसे आले तर म्हणाले लवकर पैसे काढून घ्या सरकार खात्यातून पैसे काढून घेणार आहे. अरे शहाण्यांनो, बहिणीला दिलेली ओवाळणी कुठला भाऊ काढून घेतो का? काही पण सांगता? असा संतप्त सवाल अजित पवारांनी उपस्थित केला. पुढे हे विरोधक म्हणतात हे सरकार फक्त लाडकी बहीणींकडेच बघतात भावांकडे तर कोणी बघतच नाही, अरे शहाण्यांनो, भावांकडे पण बघितले आहे. शेतकऱ्यांना सुद्धा वीजबिल माफ केले आहे. असे अजित पवार यांनी स्पष्ट केले.

अजित पवार म्हणाले, मागे लोकसभेच्या निवडणुका झाल्या. तेव्हा जनतेच्या मताने कौल दिला. परंतु, आम्हाला म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. घटनेचा शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला संविधान आणि मतांचा अधिकार दिला आहे. त्याबद्दल आपल्याला सगळ्यांना आदर आहेच आणि कायम राहणार. परंतु काही वेगळ्या गोष्टींचा प्रचार केला गेला आणि त्याची किंमत महायुतीला मोजावी लागली, असे अजित पवार म्हणाले.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा जबाबदारी स्वीकारल्यावर ते अतिशय गतीने कामाला लागले. पहिल्या शंभर दिवसांमध्ये देशाच्या विविध भागांमध्ये प्रकल्प मंजूर केले तसेच महाराष्ट्राला देखील करोडो रुपयांच्या योजना त्यांनी आपल्या शिव-शाहू-आंबेडकरांच्या महाराष्ट्राला दिल्या. आपल्या सोलापूरचे विमानतळ देखील काही काळापर्यंत दुर्लक्षित झाले मात्र केंद्र आणि राज्यसरकारच्या मदतीने पुन्हा ते स्थिरस्थावर करण्यात आला आहे. हवाई वाहतुकीची सोय महाराष्ट्रात असावी ही भूमिका महायुती सरकारची आहे.

## विनेश फोगाटनं भाजप उमेदवाराला चितपट करत विधानसभेची कुस्ती जिंकली



हरियाणाच्या जुलाना मतदारसंघातमधून कॉंग्रेस उमेदवार आणि कुस्तीपटू विनेश फोगाट यांचा दणदणीत विजय झाल्याची मोठी बातमी समोर येत आहे. ऑलिम्पिक स्पर्धेत गोल्ड मेडलनं हुलकावणी दिली असली तरी राजकीय क्षेत्रात नशीब आजमवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. हा प्रयत्नच नाहीतर त्यांच्या या प्रयत्नांना मोठं यश आलं आहे. भाजपच्या योगेश बैरागी यांच्यावर मात करत विनेश फोगाट यांनी विधानसभा निवडणुकीत मोठा विजय मिळवला आहे. भाजपने एक दलित चेहरा म्हणून कॅप्टन योगेश बैरागी यांना उमेदवारी दिली होती. तर इंडियन नॅशनल दलने सुरेंद्र लाठर, आम आदमी पार्टीकडून कविता देवीसह एकूण 12 उमेदवार रिंगणात होते. दरम्यान निकालाच्या मतमोजणीच्या 14 व्या फेरीमध्ये अखेर विनेश फोगाट जुलानामधून 5 हजार 557 मतांनी आघाडीवर होती. अखेर विनेश फोगाटचाच दणदणीत विजय झाला. 2005 नंतर जवळपास 19 वर्षांनी जुलानामधून विनेश फोगाटच्या रुपाने कॉंग्रेसला ही जागा जिंकता आली आहे.

## सुरज चव्हाणनं झापुक झुपुक करत पटकावली 'बिग बॉस' ची ट्रॉफी, बारामतीत जंगी स्वागत



**बारामती :** बारामतीच्या सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर सूरज चव्हाण हा 'बिग बॉस मराठी ५'चा विजेता ठरला. तर गायक अभिजीत सावंत दुसऱ्या क्रमांकावर राहिला. तिसऱ्या क्रमांकावर निक्की तांबोळी आणि चौथ्या क्रमांकावर धनंजय पोवार होता. ७० दिवस सुरू असलेल्या 'बिग बॉस मराठी ५'या शोमध्ये पहिल्या दिवसापासून चर्चेत होता तो साधाभोळा, गरिब घराण्यातील सूरज चव्हाण... 'बिग बॉस मराठी ५'चा विजेता होता सूरज चव्हाण याने बिग बॉसची झगमगती ट्रॉफी आणि १४.६० लाख रुपये बक्षीस मिळवले. त्याचसोबत इलेक्ट्रिक स्कूटर आणि १० लाख रुपयांचा ज्वेलरी व्हाऊचरही त्याला देण्यात आले. सूरजचा खेळ, प्रामाणिकपणा, वैयक्तिक आयुष्यातील खडतर प्रवास सूरजने आपले वेगळे चाहते बनवले. सूरज चव्हाण हा 'बिग बॉस मराठी सीजन ५' चा विजेता घोषित झाल्यानंतर त्याच्यावर सर्वांकडूनच कौतुकांचा वर्षाव केला जातोय. यामध्ये मराठी कलाकार, सामान्य जनतेपासून ते राजकीय नेते मंडळींनी देखील सूरज चव्हाणचं तोंडभरून कौतुक करत सोशल मीडियावर त्याच्या पोस्ट टाकल्या. यानंतर आता 'बिग बॉस' ची ट्रॉफी जिंकल्यानंतर झापुक झुपुक फेम सुरजचं बारामतीत जंगी स्वागत करण्यात आलं.

## 'लाइक आणि सबस्क्राइब' या मराठी चित्रपटात झळकणार गौतमी पाटील

'लाइक आणि सबस्क्राइब' या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या सिनेमात अमेय बरोबर अभिनेत्री अमृता खानविलकरही मुख्य भूमिकेत आहे. 'लाइक आणि सबस्क्राइब' या सिनेमात डान्सर गौतमी पाटील देखील झळकली आहे. गौतमीचं या सिनेमात लिंबू फिरवलं हे आयटम सॉंग आहे. या गाण्यात अमेय वाघही गौतमीबरोबर थिरकताना दिसत आहे. गौतमीला सिनेमात घेण्यामागचं कारण अमेयने सांगितलं आहे. नुकतंच 'लाइक आणि सबस्क्राइब' सिनेमाचा ट्रेलर लॉन्च इव्हेंट पार पडला. यावेळी अमेयला सिनेमात गौतमीबरोबर डान्स करण्याबाबत विचारण्यात आलं. "सिनेमात जो प्रसंग आहे त्यासाठी गौतमी पाटीलपेक्षा दुसरा चांगला ऑप्शन महाराष्ट्रात नाही. लहानांपासून मोठ्यांपर्यंत गौतमीचे खूप चाहते आहेत, हे आपल्या सगळ्यांनाच माहितीये. ती जिथे शोज करते. तिथे झाडावर लोक बसलेले असतात. छपरावर बसलेले दिसतात. तिच्या शोला खूप गर्दी असते. हे सगळे लोक मराठी सिनेमा बघायला जात नाहीत. म्हणून गौतमीला आम्ही सिनेमात घेतलंय. तिला बघायला लोक गर्दी करतात. तिच्या शोला जशी गर्दी होते, तशी गर्दी मराठी सिनेमांना व्हावी. मी थिएटरच्या आसपास छप्पर, झाडांची सोय करतो. त्याची पण तिकीट विकतो. पण, त्यासाठी का होईना सगळ्यांनी 'लाइक आणि सबस्क्राइब'सिनेमा बघण्यासाठी थिएटरमध्ये यायला हवं", असं अमेय म्हणाला. अलिकडेच 'लाइक आणि सबस्क्राइब' सिनेमाचा ट्रेलर प्रदर्शित



करण्यात आला आहे. हा एक रहस्यमयी थ्रिलर सिनेमा आहे.

१८ ऑक्टोबरला 'लाईक आणि सबस्क्राईब' चित्रपट रिलीज होणार आहे. नितीन वैद्य प्रॉडक्शन्स प्रस्तुत, एस. एन. प्रॉडक्शन्स एलएलपी आणि अभिषेक मेरूकर प्रॉडक्शन्स यांच्या सहकार्याने प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटाचे नितीन प्रकाश वैद्य, अभिषेक मेरूकर निर्माते असून 'लाईक आणि सबस्क्राईब'चे लेखन आणि दिग्दर्शन अभिषेक मेरूकर यांनी केले आहे. यात अमेय वाघ, अमृता खानविलकर, जुई भागवत, शुभंकर तावडे, विठ्ठल काळे यांच्या प्रमुख भूमिका आहेत.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०९ ऑक्टोबर २०२४




## प्रत्येक महिलेत एक कलाकार दडलेला- आव्हाड 'खेळ पैठणीचा-जल्लोष नवरात्रीचा' कार्यक्रम

**पाथर्डी** : प्रत्येक स्त्रीमध्ये कोणत्या न कोणत्या स्वरूपात शक्तीरुपिणी दुर्गेचा संचार असतो. त्याच रूपाच्या बळावर आजची स्त्री आत्मनिर्भर झाली असून, स्वबळावर उंच भरारी घेत आहे. प्रत्येक स्त्रीमध्ये एक बहीण, एक आई, एक पत्नी असते, त्याचप्रमाणे प्रत्येक स्त्रियांमध्ये एक कलाकारही दडलेला असतो. त्यामुळेच त्यांच्या कलागुणांना हक्काचं व्यासपीठ देण्यासाठी मैत्रेयी ग्रुप दरवर्षी नवरात्रोत्सवात स्त्रियांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करते. नवरात्र म्हणजे शक्तिरूपिणी दुर्गेचा उत्सव साजरा करण्याचे दिवस असल्याचे प्रतिपादन मैत्रेयी ग्रुपच्या अध्यक्षा कविता आव्हाड यांनी केले.

बाबूजी आव्हाड महाविद्यालयात अभय आव्हाड सामाजिक प्रतिष्ठान व मैत्रयी ग्रुपतर्फे आयोजित 'खेळ पैठणीचा-जल्लोष नवरात्रीचा' या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर सिद्धार्थ पन्हाळे, निशा मते, सारिका नाईक, दीपाली बंग, खेळाडू कोमल वाकळे, प्राचार्य डॉ. बबन चौरे आदी उपस्थित होते. कविता आव्हाड म्हणाल्या, की पाथर्डी तालुक्यातील सांस्कृतिक वैभवात भर घालण्यासाठी मैत्रेयी ग्रुप सदैव प्रयत्नशील असून, आज खेळ पैठणीचा कार्यक्रमात भाग घेतलेल्या व जिंकलेल्या समाजातील या दुर्गा सर्वांसाठीच प्रेरणादायी आहेत.

यावेळी छोटे भावजी सिद्धार्थ पन्हाळे यांचा खेळ पैठणीचा हा कार्यक्रम झाला. संगीतखुर्ची, रस्सीखेच, चेंडू फिरवणे, फुगे फोडणे, रिंगमध्ये चेंडू टाकणे आदी खेळ खेळण्यात आले. अंतिम फेरीत मानाची पैठणी साक्षी सांगळे हिने मिळवली. सोन्याची नथ शिवकन्या खेडकर हिला, तर साडी पल्लवी शिंदे व प्रा. विद्या घोडके यांना मिळाली. स्पर्धेत विविध बक्षिसांचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल खेळाडू कोमल वाकळे हिचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. सुरेखा चेमटे यांनी, सूत्रसंचालन प्रा. डॉ. वैशाली आहेर यांनी, तर रेश्मा सातपुते यांनी आभार मानले.

## आशिष शेलारांविरोधात काँग्रेसचा उमेदवार ठरला:वांद्रे पश्चिममधून प्रिया दत्त लढणार?



**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. मुंबईच्या वांद्रे पश्चिम विधानसभेसाठी भाजपचे आशीष शेलार प्रतिनिधित्व करत आहेत. आता या मतदारसंघात अनेक वर्षांपासून राजकारणापासून दूर असलेल्या कॉंग्रेसच्या नेत्या प्रिया दत्त यांना उमेदवारी देण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यानुसार प्रिया दत्त पुन्हा एकदा राजकारणात सक्रिय झाल्याचे बघायला मिळत आहे.

२०१९ सालच्या लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेस नेत्या प्रिया दत्त यांचा पराभव झाला होता. या पराभवानंतर प्रिया दत्त या पक्षाच्या कुठल्याच कार्यक्रमांमध्ये तसेच राजकारणात देखील फारसे सक्रिय दिसल्या नाहीत. २०२४ च्या लोकसभेसाठी देखील त्यांच्या नावाची चर्चा झाली होती, मात्र काही कारणास्तव त्यांना उमेदवारी देण्यात आली नव्हती. मात्र आता विधानसभा निवडणुकीसाठी त्यांच्या नावाची चर्चा सुरू असून उमेदवारी देखील जवळपास निश्चित होण्याची शक्यता आहे.

कॉंग्रेस नेत्या प्रिया दत्त यांना उमेदवारी जाहीर झाल्यास वांद्रे पश्चिम येथे भाजप नेते आशिष शेलार व प्रिया दत्त अशी लढत बघायला मिळणार आहे. लोकसभा निवडणुकीत प्रिया दत्त यांच्या जागेवर वर्षा गायकवाड यांना संधी देण्यात आली होती व भाजप उमेदवार उज्ज्वल निकम यांना पराभूत करत त्या खासदार म्हणून निवडणून आल्या. आता विधानसभेसाठी प्रिया दत्त यांना संधी दिली जाऊ शकते.

दरम्यान, वांद्रे पश्चिम जागा प्रिया दत्त यांना सोडली तर वांद्रे पूर्ववर शिवसेना ठाकरे गटाकडून दावा केला जाऊ शकतो. गेल्या वर्षीच्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसकडून झिशान सिद्दीकी विजयी झाले होते. मात्र आता झिशान सिद्दीकी यांनी काँग्रेसची साथ सोडली आहे. झिशान सिद्दीकी यांनी शिवसेना उमेदवाराचा पराभव करत विजय मिळला होता.






## दमदार कवितांचा धगदार दस्तऐवज : अक्षरवेल




अक्षरवेल! कविता ही आपल्या देशातच नव्हे तर जगात प्रिय असलेली विधा आहे. आशयघन कविता मनाला टवटवीत ठेवायचं काम करते. शंकर घोरसे नावाच्या अष्टपैलू प्रतिभावंताने अतोनात परिश्रम घेऊन 'अक्षरवेल' नावाचा दर्जेदार, संग्राह्य प्रातिनिधिक कविता संग्रह संपादित केला आहे. साहित्यिक, कवी, चिंतक, अभिनेता, दिग्दर्शक व विमर्शक असलेल्या प्रतिभेची ही कृती संग्राह्य नि् अजोड अशी आहे. 'ज्ञानपथ' प्रकाशनची ही देखणी, आशयघन काव्यसंपदा मराठी काव्य दालनाचा गौरव गुणित करणारी आहे.रवीन्द्र शोभणे, विठ्ठल वाघ, बबन सराडकर, वसंत वाहोकार, लोकनाथ यशवंत या मुरब्बी हस्ताक्षरांनी संग्रहाची शान वाढवली आहे. या संग्रहात अर्जुमन बानोसारखी मायमातीची आराधना करीत अन्नदात्यासाठी समृद्धीचं वैभव मागणारी कलंदर कवयित्री भेटते. 'मोल घामाचं' या कवितेत शेतकरीच्या पत्नीचं अफाट दु:ख कवेत घेणारा कवी खुशाल गुल्हाने भेटतो!

'शहिदाची आई' मधील-

"देशासाठी बलिदान<br>
देऊनि गेलं लेकरू<br>
भारत मातेचे माझ्या<br>
हाल हाल नका करु !'

या ओळी सैनिकांवर प्रश्न विचारणाऱ्या लबाड राजकारण्यांना अनावृत्त करतात. डॉ. एकनाथ पांडवे -

"झेंड्यानीच आता<br>
फडकण्याचे थांबवायला हवं<br>
ऐक्याचे टोक मिळेपर्यंत...."

या अर्थसघन ओळी दलित, सामाजिक चळवळींच्या स्वार्थी विघटनवादी वृत्तीवर प्रहार करतात.

"कोणता माणूस आहे आत माझ्या<br>
मी म्हणूनच जात नाही आत माझ्या<br>
जा, जरी म्हटले तरीही जात नाही<br>
भूक आहे केवढी धाकात माझ्या"

अजीजखान पठाण यांनी गझलेला चढवलेला सामाजिक गणवेष पाहून ख्यातकीर्त गझलकार बशीर बद्र यांची आठवण होते. कुणाला मातीचा लळा तर कुणाला ओली सांज आठवते. विविध आशयाच्या, विविध रूपाकाराच्या, विविध आशयाच्या कवितांनी नटलेली ही अक्षरवेल मन मोहून टाकते! सजग वाचक, आस्वादकांच्या मनात ही कवितांची टवटवीत अक्षरवेल रोपण्यात परिश्रमी संपादक यशस्वी आले आहेत. कविता कवीचे कर्म असते. जडतेला तोडणारा सृजनात्मक प्रयत्न असते कविता! मी प्रचंड गाजलेल्या 'ठिणगी' कविता संग्रहात म्हटलं होतं -

कविता:

"दर्पणाचा पारा<br>
खळाळती धारा<br>
चैतन्याचा वारा असते!"

कविता:

"ममतेचा पंख<br>
गर्जनेचा शंख<br>
बंडाचा डंख असते !" ठिणगी. पृष्ठ.....३

'गोधडी' कवितेतून आजीची लाख मोलाची आठवण जागते. 'बाबासाहेब' ही कविता त्यांचं अफाट व्यक्तित्त्व पुढे ठेवते. 'सौंदर्यवती' या कवितेतून सौंदर्याच्या मधाळ ओळी टपकतात. "श्रावणधारा बरसू लागल्या सजली ही धरणीशृंगाराचा साज लेऊनी जणू भासे नवतरुणी !"एखाद्या कवयित्रीला वात्सल्य पाझरत ठेवणाऱ्या मायचा पदर मोठा वाटतो तेव्हा त्या माऊलीची कूस धन्य होते.

"माय तुझा पदर म्हणजे<br>
शिखर गाठण्याचे पंख<br>
मनगटातील लक्ष्यबळ<br>
वाजवितो विजयी शंख"

कवयित्रीच्या प्रतिभेतून साकारलेल्या अशा ओळी सार्थकी लागतात. रक्तदानाचं, विद्यादानाचं, बाईपणची, समजदार व्हायची शिकवण देणाऱ्या कविताही या कृतीत भेटतात, त्यामुळेच शंकररावांनी भरवलेलं हे भरगच्च 'कवी-संमेलन' लाजबाब झालंय. प्रा. मीनल येवले सातत्याने लेखन करणाऱ्या प्राध्यापिका आहेत. त्यांची 'बाई आणि माती' ही कविता सृजनाचा संदेश देत मोठा आशय सांगणारी सकस कविता आहे."माझ्या कवितेने जावं, रोज फिरण्या रानातअन् तिनं सांगावं गुपित, वाऱ्याच्या कानात" ही कविता राब-राब राबणाऱ्या पोशिंद्याला वाहिलेला मानाचा मुजराच आहे. काही स्वनामधन्य तुच्छतावादी समीक्षक नवोदितांच्या कविता न वाचता टीका करतात. एक महा तुच्छतावादी तर या कवितांना रद्दीछाप म्हणाला होता."फासा भिजून गेल्या वखरून वावरालेपाझर अजूक नाई आला तरी ढगाले""माझा बळीराजा झाला आज बळीचा बकरानिसर्गासहित साऱ्यांनी केला त्याचा कचरा"

"असे मराठी माय आपुली<br>
आब राख तू शिवबापरी<br>
जिजाऊसम तिची अस्मिता<br>
निशाण फडकव गगनावरी"

अशा दमदार प्रतिभांचं स्वागत का होऊ नये ? "आजचा कवी, वैज्ञानिक चेतनेचा कवी आहे. त्याची दृष्टी विश्वाच्या संपूर्ण क्रियाशीलतेचं अध्ययन करीत आहे!" असं एका चिंतकाने म्हटलंय. या कविता संग्रहात विविध आशयाच्या कविता आहेत. एका कवीने चन्द्रावर जाणाऱ्या चान्द्रयानाचा संदर्भ दिलाय. अन्नदात्याची वेदना अक्षरबद्ध करणाऱ्या बऱ्याच कविता आहेत. व्यसनावरच्या कवितेत एक कवी म्हणतो-

"नाई फिकर रायली<br>
तुले मानसा देहाची<br>
रोज लागते ढोसाया<br>
दारू गावठी मोहाची!"

व्यसनाचा भेसूर परिणाम कवीने अचूक टिपला आहे. पंढरी कवितेतील संपादक शंकरराव घोरसे यांच्या चिंतनगर्भ ओळी मननीय आहेत. ते म्हणतात —

"पुढारले किती । विज्ञानाचे भक्त।<br>
प्रयोगाने रक्त। निघेच ना ॥<br>
सज्जनाच्या आता । मनातील पाप<br>
एक्सरेचा बाप । दाखवे ना ॥

या धाडसी निर्भय कवीने विज्ञानाच्या मर्यादा दाखऊन दिल्या आहेत. कार्यकारी संपादक प्रभाकर तांडेकर यांचंही अभिनंदन. त्याची पाठराखण आणि हटके तडित वृत्तातील गझल अल्पाक्षरी प्रतिभेचे उत्तम उदाहरण आहे. एका लेखात सर्वच एकशे एक कवींचा नामोल्लेख करता येणं शक्य नाही. या सर्व प्रतिभांकडून सकस काव्य निर्मिती होत राहो ही शुभेच्छा!प्रा. डॉ. शोभा रोकडे यांनी प्रस्तावना खूपच जीव ओतून लिहिली आहे. त्या विशाल मनाच्या विमर्शक आहेत. सर्व अंगांनी सरस उतरलेल्या या कृतीची वाङ्मयीन संस्थांनी नोंद घेऊन या प्रयत्नाला पुरस्कृत करायला हवे. "शब्द सुवासिक व्हायचे असतील तर लेखकाच्या हृदयाची भूमी सहानुभूतीने भिजली पाहिजे!" असं थोर समीक्षक निर्मलकुमार फडकुले म्हणाले होते. अशा कवींच्या प्रतिभेचं दर्शन संपादकांनी घडवलंय. ज्ञानपथ पब्लिकेशनचे सचिन सकलकर यांनी संग्राह्य दस्तऐवज दिला. त्यांचेही अभिनंदन ! विविध ऊर्जावान उपक्रम राबवणाऱ्या अक्षरक्रांती फाऊंडेशनला शुभेच्छा!


**डी. बी. जगत्पुरिया**<br>
मो. ९८६०४८५३९८<br>
'संगर', पाण्याच्या टाकीजवळ,<br>
मीरानगर, पडेगांव,औरंगाबाद - ४३१००२